**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>सरतपास शपथेवर वादीचे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत.</u>**

०२. मी आज रोजी माझ्या सोबत टिपण आणलेले आहे. मी आता सदरचे टिपण तयार केलेले आहे. मी आज रोजी मोजणीच्या वेळेस सोबत नेलेले टिपण आणलेले नाही. मला सदरचे टिपण मिळालेले नाही. मी आज रोजी माझ्या सोबत आणलेल्या टिपणाचे प्रमाणे १:२० साखळी असे आहे. मी काढलेला नकाशा १:१००० या प्रमाणामध्ये काढलेला आहे. प्रमाण १:२० केल्यास मी आज सादर केलेल्या टिपणामधील नकाशा साधारणपणे आठपट होईल. माझ्या टिपणाप्रमाणे नकाशा हा आठपट बसायला पाहिजे. मी टिपण हे न्यायालयामध्ये दाखल करु शकतो. सदरचे टिपण सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ व १३ चे आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे सदरचे टिपण बरोबर आहे. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये आज सादर केलेल्या टिपणाप्रमाणे आठपटीचा नकाशा दाखल केलेला नाही. मला आता नि.क्र.५४ वरील नकाशा दाखविण्यात आला. सदरचा नकाशा आमच्या कार्यालयामार्फत तयार केलेला आहे. सदरचा नकाशा सर्वे नं. ३ हिस्सा नं.१२ व १३ चा आहे, त्याचा जुना सर्वे नं. ३९२ आहे. त्यावर तत्कालीन मुख्य अधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. मी आणलेला टिपण उतारा व नि.क्र.५४ वरील नकाशातील मजकुर हा सारखा आहे. मी आठपटीतील नकाशा तयार करु शकतो.

प्रश्न – तुम्ही न्यायालयासमक्ष आठपटी प्रमाणात नकाशा तयार करुन दाखवा ?

( प्रतिवादीच्या विधीज्ञांनी न्यायालयासमक्ष असा नकाशा तयार करुन दाखविण्याबाबत कायद्यामध्ये कुठलीही तरतुद नसल्यामुळे असा प्रश्न साक्षीदारास विचारता येऊ शकत नाही असा आक्षेप घेण्यात आला. वादीच्या विधीज्ञांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये आठपटी प्रमाणातला कुठलाही नकाशा दाखल केलेला नाही असे सांगितले व सदरचा साक्षीदार हा तज्ञ साक्षीदार असल्यामुळे त्याला असा प्रश्न विचारता येऊ शकतो असे सांगितले.

उभय पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने, साक्षीदाराने काढलेला नकाशा योग्य आहे

किंवा नाही ही बाब तपासण्याकरीता सदरचा साक्षीदार वादीतर्फे न्यायालयामध्ये बोलविण्यात आलेला आहे. साक्षीदाराच्या न्यायालयासमक्ष आलेल्या पुराव्यावरुन नकाशा हा योग्य आहे अथवा नाही या बाबी तर्क व वितर्काच्या आधारे ठरविता येवू शकतात, त्याकरिता साक्षीदाराला न्यायालयासमक्ष नकाशा काढण्याची आवश्यकता नसल्याने प्रतिवादीतर्फे विचारण्यात आलेला प्रश्न नामंजुर करण्यात येतो. )

०३. मला आता नि.क्र.५४ वरील नकाशा दाखविण्यात आला. सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ व १३ यामध्ये असलेली रेषा सरळ आहे. मला आता मी सादर केलेले टिपण दाखविण्यात आले. सदर टिपणामधील सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ व १३ मधील लाईन तिरकी दाखवलेली आहे. नि.क्र.५४ वरील नकाशाप्रमाणे मी न्यायालयात सादर केलेला नकाशा जुळत नाही. नि.क्र.५४ वरील नकाशा आठपट केल्यानंतर मी काढलेला नकाशा कसा जुळत नाही ही बाब दिसू शकते. मी तयार केलेल्या नकाशाची ' ब प्रत ' न्यायालयामध्ये दाखल केलेली आहे. मला आता नकाशाची ब प्रत दाखविण्यात आली. सदर नकाशा मी तयार केलेला आहे. मी नकाशाची अ प्रत माझ्या सोबत आणलेली आहे. नकाशाच्या अ प्रत प्रमाणे नकाशाची ब प्रत तयार केलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>नि.क्र.११३</u>** दिली आहे.

०४. हिस्सा नं. १३ चे तीन कोन आहेत. हिस्सा नं.१३ चे लघुकोन आहेत. हिस्सा नं.१२ व १३ च्या समोरुन रस्ता जातो. मला आता मी सादर केलेले टिपण दाखविण्यात आले. हिस्सा नं.१३ चा कोन हा काटकोन आहे. मी काढलेल्या नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१३ चा लघुकोन आहे. नि.क्र.५४ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१३ चा कोन हा काटकोन आहे. नि.क्र.५४ वरील नकाशा व नि.क्र.११३ वरील नकाशामधील हिस्सा नं.१३ चे कोन जुळत नाहीत. नि.क्र.५४ वरील नकाशा व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये फरक आहे. नि.क्र.५४ वरील नकाशा व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१२ मध्ये फरक आहे. नि.क्र.५४ वरील नकाशा व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१२ च्या पुर्वेकडील हद्द ही सरळ रेषेमध्ये हवी होती. मला आता नि.क्र.११३ वरील नकाशा दाखविण्यात आला. त्यामधील हिस्सा नं.१२ च्या पुर्वेकडील हद्द सरळ रेषेमध्ये नाही. नकाशामध्ये हिस्सा

नं.१३ च्या पुर्व बाजूस पेन्सीलमध्ये बुरुज दाखविलेला आहे. हिस्सा नं.१३ च्या पुर्वेकडील हद्द सदर बुरुजापासून ' सी ' आद्याक्षराने दाखविलेल्या बुरुजापर्यंत दाखवणे गरजेचे होते. नि.क्र.५४ वरील नकाशा व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१२ व १३ मध्ये दाखविण्यात आलेली हद्द एकमेकांशी जुळत नाही. नि.क्र.५४ प्रमाणेच नि.क्र.११३ वरील नकाशा मी काढलेला आहे.

**(मध्यांतराची वेळ झाल्याने सरतपास मध्यान्ह सुट्टी पर्यंत तहकूब करण्यात येतो.)**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
महेश रा. देवकते

दिनांक : १९/१२/२०२३
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण

**<u>मध्यांतरानंतर पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एम.बी.दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

०५. मला आता यादी नि.क्र.११७ वरील टिपण दाखविण्यात आले. सदरचे टिपण मी तयार केलेले आहे. सदरचे टिपण हे मुळ गट बुकावरुन तयार केलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.११८</u>** दिली आहे. नि.क्र.५४ व नि.क्र.११३ वरील नोंदी सारख्या आहेत. मी काढलेला नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ च्या पुर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या दाखवलेल्या हद्दी माझ्या टिपणाप्रमाणे आहेत. मी काढलेला नि.क्र.११३ वरील नकाशा व नि.क्र.११८ वरील टिपणातील पुर्वेकडील हद्द सारखी नाही. मी नि.क्र.११३ वरील काढलेल्या नकाशामध्ये व नि.क्र.११८ वरील टिपणामध्ये पश्चिमेवरील हद्दीमध्ये कुठलाही फरक नाही. मी हिस्सा नं.१२ ची हद्द लाल रंगामध्ये दाखवलेली आहे. नि.क्र.११८ वरील टिपणामधील हिस्सा नं.१२ ची पश्चिमेकडील हद्द सरळ रेषेमध्ये आहे. नि.क्र.११८ वरील टिपणामध्ये हिस्सा नं.१२ ची पश्चिमेकडे सरळ रेषेत दर्शविण्यात आलेली हद्द नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये दिसून येत नाही. नि.क्र.११८ वरील टिपणामध्ये हिस्सा नं.१२ ची पश्चिमेकडील हद्द काटकोनामध्ये आहे. नि.क्र.११३ मधील नकाशामध्ये हिस्सा

नं.१२ ची पश्चिमेकडील हद्द लघुकोनामध्ये आहे. माझ्या नि.क्र.११८ वरील टिपणामध्ये हिस्सा नं.१३ च्या पुर्वेकडील हद्द त्रिकोणामध्ये दाखवलेली नाही. नि.क्र.११८ वरील टिपण व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१२ च्या पुर्वेकडील हद्दीमध्ये फरक आहे. नि.क्र.११८ वरील टिपण व नि.क्र.११३ वरील नकाशामध्ये हिस्सा नं.१३ च्या दर्शविलेल्या त्रिकोणाच्या दिशा बदलेल्या आहेत. मी माझ्या नि.क्र.११८ वरील टिपणाप्रमाणे आठपटीचा नकाशा जागेवर तयार केला होता. सदरचा नकाशा माझ्याकडे मोजणीच्या वेळेस होता. मी सदरचा नकाशा माझ्या कार्यालयाकडे जमा केला होता. मी आठपटीत तयार करण्यात आलेल्या नकाशाची माझ्या कार्यालयाकडे साक्ष देण्याच्या पुर्वी मागणी केली नव्हती. माझा आठपटीमध्ये तयार करण्यात आलेला नकाशा नि.क्र.११३ वरील नकाशाशी जुळत नाही.

०६. मला आता यादी नि.क्र.११५ वरील नकाशा दाखविण्यात आला. आठपटीत काढलेला नकाशा नि.क्र.११५ वरील नकाशाप्रमाणे होवू शकत नाही. मला आठपटीचा नकाशा काढण्यास सांगितल्यास मी न्यायालयासमक्ष काढू शकतो. नि.क्र.११८ वरील टिपण व यादी नि.क्र.११५ वरील नकाशामधील हद्दी सारख्या आहेत.

( वादीच्या वकिलांनी सरतपासादरम्यान वारंवार साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले. न्यायालयामार्फत कलम १४२ भारतीय पुराव्याच्या कायद्याच्या अनुषंगाने सरतपासाच्या दरम्यान उत्तर सुचक प्रश्न विचारता येवु शकत नाही असे वादीच्या विधीज्ञाच्या निदर्शनास आणुन दिले असता, वादीच्या विधीज्ञांनी ज्यावेळी तज्ञ साक्षीदाराचा सरतपास घेतला जातो, त्यावेळेस सरतपासाच्या दरम्यान उत्तर सुचक प्रश्न विचारता येवु शकतात, त्या अनुषंगाने, मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय आहेत असे न्यायालयास कळविले. त्यामुळे सरतपासाच्या दरम्यान उत्तर सुचक प्रश्न विचारता येवु शकतात किंवा नाही ही बाब निर्णीत होईपर्यंत साक्षीदाराचा पुढील सरतपास तहकुब करण्यात येतो. )

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : १९/१२/२०२३

महेश रा. देवकते
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण